* माहिती *

# वाशिम जिल्हा पोलीस दल

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.२३/१२/१९

---

## स्थानिक गुन्हे शाखा वाशिम ची कारवाई.

## आसेगांव पेन नदीवरील रहस्यमय खुनाचे दाखल गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेकडुन उलगडा.

दिनांक ०६/१२/१९ रोजी फिर्यादी रवि संतोष आरू वय २७ वर्ष रा रिठद ता.जि.वाशिम यांनी पो.स्टे. रिसोड येथे तक्रार नोंदविली की,त्याचा आतेभाऊ संदीप शेषराव बकाल वय २८ वर्ष रा.धोडप उगले ता.रिसोड याचे धानोरा वाकुडकर येथील एका मुली सोबत प्रेम संबंध आहेत तो नेहमी त्या मुलीसोबत मोबाईलवर बोलतो याबाबतची माहीती त्याचे आई वडील भाऊ व जवळच्या सर्व नातेवाईकांना आहे. दि.२७/११/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. चे सुमारास शेतात हजर असतांना संदीप बकाल याचा फोन आला की,रिठद येथे आलो आहे त्यास शेतात येण्यास सांगीतले असता तो त्याचे मोटार सायकल बजाज एक्स सीडी क्रमांक एम.एच.३७ ई ३७६५ ने शेतात आला त्यास अचानक येण्याचे कारण विचारले असता त्याने सोनखास येथुन आलोत असल्याचे सांगीतले त्यास जेवणाविषयी विचारले असता त्याने मला संध्यकाळी वाशिम येथे मित्राकडे पार्टीला जायाचे आहे असे सांगीतले संदीप हा त्या दिवशी वेळोवेळी फोनवर बोलत होता संध्याकाळी रिठद येथील बसस्टॅन्डवर सलुनचे दुकानात संदीप यास पुन्हा फोन आला त्यावेळी संदीप हा दुर अंतरावर जावुन बोलत होता. फोन बंद झाल्यानंतर संदीप ने पेट्रोल टाकुन येतो असे सांगुन रिठद स्टॅन्डवरून निघुन गेला. बराच वेळ होवुन संदीप परत आला नाही म्हणुन त्यास बरेच फोन केले रात्री १०.३० वा.त्याचा मोबाईल स्विच ऑफ आला दुसरे दिवशी संदीप चे वडीलांनी फोन करून विचारपुस केली असता त्यांना वरील प्रमाणे सांगीतले. दि.०३/१२/२०१९ पर्यंत संदीप मिळुन न आल्याने संदीपचे वडीलांनी पोलीस ठाणे रिसोड येथे संदीप हरविल्यबाबत तक्रार नोंदविली दि. ०६/१२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास गावात चर्चा सुरू होती की, आसेगाव पेन येथील नदीत कोणीतरी माणुस पाण्यात बुडुन मरण पावला आहे. म्हणुन मी आसेगाव पेन येथील नदीवर गेलो थेडया वेळाने पोलीस आले पोलीसांनी लोकांच्या मदतीने प्रेत बाहेर काढले तेव्हा त्या प्रेताचे पाय मोटार सायकलला बांधलेले आढळुन आले जवळ जावुन पाहीले असता मृत ईसम संदीप असल्याचे ओळखले. संदीप यास कोणीतरी अज्ञात ईसमांनी २७/११/२०१९ चे रात्री ०८.४५ ते दि.०६/१२/२०१९ चे १३.०० वा.दरम्यान मारून दोन्ही पाय मोटर सायकला बांधुन नदीचे पाण्यात टाकुन दिले अशा रिपोर्ट वरून पोलीस ठाणे रिसोड येथे गुन्हा रजीष्टर नंबर ५३०/१९ कलम ३०२,२०१ भादंवी अन्वये गुन्हा नोंदवुन तपासात घेतला.

गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने घटनास्थळास तात्काळ सहायक पोलीस अधिक्षक डॉ.पवन बनसोड,पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे यांनी त्यांचे पथकासह भेट दिली घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करून तपास अधिकारी यांना महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच गुन्हयाचे तपासाबाबत वेळोवेळी पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांना माहीती देवुन तपास कामी मार्गदर्शन घेण्यात आले.गुन्हयाचा प्राथमीक तपास सुरू असतांना फिर्याद मध्ये नमुद असलेल्या विषयाचे संबंधाने धानोरा वाकुडकर येथील मृतक बकाल याची प्रेमीका व त्यांचे नातेवाईक तसेच फिर्यादी रवि आरू,संदीप चे मित्र शिरसाळा येथील संतोष इंगोले यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन बारकाईने विचारपुस करण्यात आली परंतु गुन्हा उघडकिस येईल अशी कोणाकडुनही माहीती प्राप्त झाली नाही.पोलीस निरीक्षक स्थानीक गुन्हे शाखा श्री शिवा ठाकरे यांनी स्वत: त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी कर्मचा–यासह रिसोड,वाशिम परीसरात सतत फिरून मृतक संदीप बकाल याचे पुर्व इतीहासाबाबत गोपनिय रित्या माहीती घेतली असता अशी माहीती मिळाली की,मृतक संदीप हा तरूण असुन त्याचे लग्न झालेले नाही त्यास मागील तिन ते चार वर्षापासुन त्याचे आई वडील व नातेवाईक लग्नाकरीता मुली दाखवित आहे परंतु तो काहीना काही कारणावरून मुली नापसंत करतो शेवटी वडीलांनी कंटाळुन संदीप याचे परवानगीने संदीप पेक्षा लहान असलेला मुलगा प्रदीप याचे सन २०१८ मध्ये लग्न करून दिले. संदीप याचे धानोरा येथील मुलीसोबत एकतर्फी प्रेम होते

Scanned by CamScanner

* माहिती *

# वाशिम जिल्हा पोलीस दल

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.२३/१२/१९

---

त्यातच त्याने तिचे नातेवाईकाकडे लग्नासाठी मागणी सुदधा केली होती परंतु मुलीचे नातेवाईकांनी त्यास नकार दिला होता. संदीप याचे जवळ नेहमी मोठी रक्कम राहत होती.संदीप यास स्त्रीयांचे वेड होते तो प्रत्येक स्त्री कडे वाईट नजरेने पाहत होता अशा मिळालेल्या माहीती वर तपास नेमका कोणत्या दिशेने करावा याबाबत प्रथम संभ्रम निर्माण झाला त्यामुळे वेळोवेळी वरीष्ठ अधिकारी पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी,सहायक पोलीस अधिक्षक डॉ.पवन बनसोड यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. फिर्यादी रवि संतोष आरू रा.रिठद, मृतकचे मित्र,मृतकचा मावसभाऊ राहुल इंगोले, मंगेश इंगोले, संतोष ऊर्फ गोलु इंगोले सर्व रा.शिरसाळा तसेच मृतक संदीप याचा सख्खा भाऊ प्रदीप शेषराव बकाल रा.धोडप यांना स्थानीक गुन्हे शाखा कार्यालय वाशिम येथे तपास कामी बोलावुन बारकाईने तपास केला असता प्रदीप शेषराव बकाल याने राहुल गजानन इंगोले,संतोष ऊर्फ गोलु रतन इंगोले,रामप्रसाद सुभाष इंगोले यांचे मदतीने संदीप बकाल यास ठार मारून प्रेत मो.सा सह आसेगाव पेन येथील नदीचे पाण्यात टाकुन दिले.

अशा प्रकारे रहस्यमय दाखल खुनाचे गुन्हयाचा पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे,सपोनि अतुल मोहनकर,अजय वाढवे पोउपनि भगवान पायघन, सपोउपनि भगवान गावंडे,नारायण जाधव,संजय नंदकुले, पोना किशोर चिंचोळकर, सुनिल पवार, प्रशांत राजगुरू, अमोल इंगोले,राजेश राठोड, प्रेम राठोड, बाळु कंकाळ, मुकेश भगत, प्रेम आडे, पोकॉ आश्विन जाधव, राजेश गिरी, संतोष शेणकुडे,प्रविण राऊत, बालाजी बर्वे, किशोर खंडारे, राम नागुलकर यांनी पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी सहायक पोलीस अधिक्षक डॉ.पवन बनसोड यांचे मार्गदर्शनात तपास करून उलगडा केला आहे. गुन्हयात निष्पन्न झालेले चारही आरोपी पोलीसांचे ताब्यात असुन अटकेची कारवाई सुरू आहे.

SThakare

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम

Scanned by CamScanner